IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# संत श्रेष्ठ बसवेश्वर यांची वचने

**डॉ.विनोद अनिलराव तुंगे**
(मराठी विभाग प्रमुख)
भानुदासराव चव्हाण महाविद्यालय,लोहारा

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*धर्मांचे संस्थापक, अंधश्रध्दा व लिंगभेदाला विरोध, साहित्यातून समतेचा संदेश*

**ABSTRACT**

संत परंपरेमध्ये एक वेगळेपणा आणण्याचे काम ज्या वैचारिक विचाराचा योग्य ताळमेळ घालण्याचे काम जर कोणत्या संताच्या साहित्यातून झाला असेल तर तो निश्चित पणाने संत श्रेष्ठ बसवेश्वर यांच्या वचनातून झालेला आपणास दिसून येतो. संत बसवेश्वर १२व्या शतकातील एक महान संत कर्नाटकात झाले. त्यांनी आपल्या लेखनीतून तत्त्वज्ञ, कवी आणि वचनाची निर्मिती केली. त्याच बरोबर ते वीरशैव लिंगायत धर्मांचे संस्थापक होते. त्यांनी तत्कालीन जातीव्यवस्था त्याच प्रमाणे अंधश्रध्दा व लिंगभेदाला विरोध करून 'वचन' साहित्यातून समतेचा संदेश दिला. त्यांनी वचने कन्नड भाषेत लिहली पण जे सामान्य लोकांच्या भाषेत भक्ती आणि समाज सुधारणा सांगणारे असेच वचने त्यांनी लिहील हे विशेष.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Tunge, Vinod Anilrao.** (2025). संत श्रेष्ठ बसवेश्वर यांची वचने. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **225–227**.

**प्रस्तावना -**

**'वचन' :-**

संत श्रेष्ठ महात्मा बसवेश्वरांचे वचन म्हणजे १२ व्या शतकातील कन्नड भाषेतील गद्य स्वरूपातील काव्यमय सुभाषिते आहेत. ज्यात समता,मानवता,जात-पातविरहीत समाज आणि श्रमाचे महत्त्व यावरती जोर दिला आहे. ही संत बसवेश्वरांची वचने सामाजिक सुधारणा, अंधश्रध्दा निर्मूलन आणि ईश्वरापती साधी भक्ती शिकवतात. वचनातील विचार सामान्यापासून ते योग्यापर्यंत सर्वांनाच,अनुकरणीय ठरले आहेत.वचने ही सर्व जीवनस्पर्शी, जीवनव्यापी, जीवनप्रभावी आहेत.समग्र मानवजातीला अधिकारवाणीने मार्गदर्शन करण्याची परिपूर्ण क्षमता संत श्रेष्ठ बसवेश्वराच्या वचन साहित्यात सामावलेली आहे.

**वचनातून बोध :**

संत श्रेष्ठ बसवेश्वर यांनी आपल्या असणाऱ्या वचनातून विविध बोधामृत लोकांना केले आहेत,

**१.वैज्ञानिक दृष्टी :**

"आकाश एकच वेशीबाहेर आणि वेशीतल्या आतल्यासाठी |
जमीन एकच शुद्र आणि शिवालयासाठी |
पाणी एकच शौच आणि आचमनासाठी |
पाणी एकच स्वत:ला जाणून घेण्यासाठी |
पहा हे कुडसंगमदेवा ||"[१] (वचन १२१)

संत श्रेष्ठ बसवेश्वर यांनी वैज्ञानिक दृष्टीकोनाची कास आपल्या वचनाच्या माध्यमातून मांडली आहे. वैज्ञानिक दृष्टीने कुळ वेगवेगळे नाहीत. आध्यात्मिक दृष्टीने देव वेगळे नाहीत. एकच धरती एकच कुळ आहे, एकच देव आहे. तरीही पाणी एकच आहे फक्त त्याला वापरण्यावरून त्यांची तत्वत: वेगवेगळी कशी होईल हे आपल्या वचनातून त्यांनी मांडलेली आहे.

**२.कायाकवे कैलास :**

"भव्य शिवालय बांधिती सधन |
गरिब मी सान, बांधू कैसे? |
पाय माझे खांब,देह देवालय |
शिर कळस होय,सोनियांचे |
स्थावर असे नाशिवंत |
जंगम नसे नाशिवंत |
ऐका हो कुडलसंगमदेवा |"[२] (वचन ८२१)

संत बसवेश्वर आपल्या या वचनातून सांगतात, श्रम हेच कैलास आहे. त्यासाठी कोणत्याही तीर्थाला जायची गरज नाही. मंदिरात जाण्याची गरज नाही. त्यांच बरोबर त्यांनी आपल्या अनुयायांना सुध्दा हा संदेश दिला आहे की मंदिरे बांधू नका, आपल्या देहालाच देवालय माना.देवालयापेक्षा देहालय श्रेष्ठ आहे.

**३.मुर्तीपेक्षा व्यक्ती श्रेष्ठ :**

"दगडी नाग दिसता,दुधाने अभिषेक करा म्हणती |

जिवंत नाग दिसता,मारा मारा म्हणती |

भुकेला जंगम आल्यास पुढे जा म्हणती |

न जेवणाऱ्या लिंगदेवास नैवेद्य धरा म्हणती |"[३] (वचन १९४)

या आपल्या वचनातून मूर्तीपूजेचा असणारा निर्भिड विचार संत श्रेष्ठ बसवेश्वर आपल्या वचनातून मांडताना दिसतात. माणूसकी हा धर्म किती मोठा आहे. माणसातील माणूसधर्म ठिकवण्याचे काम वचनातून केलेले दिसते.

**समारोप :**

समाजसुधारणा व वैचारिक विचाराचा वारसा संत महात्मा बसवेश्वर यांच्या विचारातून प्रकर्षाने दिसून येतो. लोकांना चांगल्या विचाराणा जतन कसे करायचे व त्या विचाराना आत्मसात करण्यासाठी काय करावे हे सांगण्याचे काम वचनाच्या माध्यामातून संत श्रेष्ठ बसवेश्वर हे करतात. म्हणूनच वचनाना एक वेगळी महत्त्व संत परंपरेत आहे.

**संदर्भ सूची :**

१. डॉ. शिवशंकर उपासे,क्रांतिसूर्य महात्मा बसवेश्वर, अक्षरधारा प्रकाशन,पुणे,२००६. पृष्ठ क्र.१४५.

२. तत्रैव १४७.

३. तत्रैव १४९.

४. एच.तिप्पेरूद्रस्वामी,भारतीय साहित्याचे निर्माते बसवेश्वर,साहित्य आकादमी,२००६.